# सायनस चा आजार  व उपचार

सायनस म्हणजे नाका भोवती असणाऱ्या  हाडांमधल्या हवेच्या पोकळ जागा. नाकाच्या वरच्या  बाजूला, आणि मागे अशा प्रत्येक बाजूला चार पोकळ्या असतात. सामान्यतः ह्यांच्यातील श्लेष्म (म्युकस) नाकाद्वरे बाहेर पडतो. जेव्हा ह्या प्रवाहात अडथळा येतो, तेव्हा हा म्युकस राहतो, त्यात जीवाणूंचा प्रादुर्भाव होतो, दाह सुरू होतो आणि पू भरतो. ह्यालाच अक्युट साईन्युसाईटीस (Acute sinusitis) असे म्हणतात . वेळेवर उपचार न केल्यास हा सायनसचा आजार कायमस्वरूपी राहू शकतो, ज्याला क्रॉनिक सायनुसायनुसायटिस. वारंवार होणाऱ्या सायनस च्या आजाराला रिकरंट ( recurrent sinusitis) म्हणतात.

## सायनस च्यां आजाराची कारणे काय?

1. सामान्य सर्दी- सर्दी पडसे मुळे नाकाच्या आतल्या आवरणाचा दाह होतो व त्याला सूज येते. सुजे मुळे सायनस चा मार्ग बंद होउन सायनस चा विकार होतो.
2. वावड्याची सर्दी(Allergy)- , धूळ, धूर, पराग कण (pollen), पशुरोष (animal droppings) किव्वा काही खाद्य पदार्थांमुळे काही जणांच्या नाकात एक अतिरंजित प्रतिक्रिया होते. ह्याच्याने नाक गळते, खूप शिंका येतात,  नाक  चोंदते. कधी नाकाच्या अंतर भागात पॉलिप “polyp” (लहान द्राक्षासारखी वाढ ) निर्माण होउन वारंवार सर्दी व सायनस चा त्रास होतो.
3. नाकाला दोन भागात विभागणारे हाड, मध्यभागी नसून एका बाजूस वाकलेले असेल तर त्या बाजुतील  सायनस ची तोंडे बंद होऊन सायनस चे विकार होतात.

## सायनस च्या आजाराची लक्षणे काय?

1. नाक चोंडणे, गळणे
2. डोके जड होणे वा दुखणे. ही डोकेदुखी सकाळी उठल्यावर किव्वा पुढे वाकल्याने जास्त प्रखर होते
3. ताप येणे
4. चेहऱ्यावर सूज येणे व वेदना होणे

## औषधोपचार

सायनसचा त्रास आहे असे लक्षात येताच कान नाक घसा तज्ञानकडे जाऊन इलाज करणे आवश्यक आहे.

1. अक्यूट सायनस इन्फेक्शन- Antibiotics, सर्दीची औषधे, वेदनाशामक औषधे, ह्यांनी चार – पाच दिवसात आजार आटोक्यात येतो. योग्य वेळी इलाज केला नाहीं तर कायम स्वरुपी त्रास राहतो( chronic sinusitis).

2. क्रॉनिक सायनुसायटिस (Chronic sinusitis) असल्यास सायनस चा CT scan काढणे आवश्यक असते. CT scan मध्ये आजार व्यापक असेल, किव्वा सायनस च्या बाहिर्वाह मार्गाला हाडाचा अगर polyp चा  अडथळा असल्यास शस्त्रक्रिया करणे गरजेचे पडते.

## सायनस ची शस्त्रक्रिया

सायनसच्या आजारामध्ये पूर्वी खुली शस्त्रक्रिया  केली जायची. ही रोग्याला अतिशय कष्टप्रद तर होतीच, पण मुख्यतः प्रभावी पण नव्हती.

Endoscopic sinus surgery (दुर्बिणीने केलेली शस्त्रक्रिया)) ही ह्या आजाराची अत्याधुनिक रित्या केलेला उपचार आहे. ही शस्त्रकरिया पूर्णपणे नाकातून केली जाते व कुठेही  बहाव्य छेद केला जात नाही. ह्या शस्त्रक्रियेत सायनस च्या तोंडाशी  असलेला  अडथला  (हाड/ पॉलीप) काढला जातो, सायनस चे नाकात उघडणारे तोंड मोठे केले जाते   जेणेकरून सायनस चे श्लेष्म भविष्यात निर्बंधपणे वाहू शकेल व सायनस मध्ये वायू संचालित राहील.

Dr. Anagha Joshi

Professor, LTMG Hospital & LTM Medical College

Consultant, HN Reliance Hospital

09820298027




शस्त्रक्रियेच्या आधी काढलेला CT scan.लाला बाण – सायनस मधील पॉलिप




शस्त्रक्रियेनंतर काढलेला CT scan लाल बाण सगळे सायनस हवेशीर वविकार रहित आहेत



नाका मधील दुर्बीण